MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



**बीड–महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष ना.समीर गुलामनबी काझी यांनी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली पत्रकार संवाद यात्रा महाराष्ट्रामध्ये नवइतिहास निर्माण करेल.**

बीड जिल्ह्याच्या भुमिपुत्राने पत्रकारांच्या न्यायहक्कांसाठी लोकशाहीच्या बळकटीसाठी सुरू केलेल्या या संवाद यात्रेला आणि तमाम पत्रकारांच्या विविध मागण्यांना शासन निश्चित न्याय देईल, शासनापर्यंत पत्रकारांची संवाद यात्रा आणि पत्रकारांच्या मागण्या मी पोहोचवण्याचा प्रयत्न करेल असा शब्द देत ना.समीर काझी यांनी पत्रकार संवाद यात्रा संदर्भात पोस्टरचे अनावरण केले. यावेळी पत्रकारसंघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, ज्येष्ट संपादक शेखर कुमार, पत्रकार संघाचे जिल्हाउपाध्यक्ष प्रा.जावेद पाशा, बसपाचे प्रशांत वासनिक यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –३१८ | शनिवार दि.१० ऑगस्ट २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -318 | SATURDAY DT.10 AUGUST 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# घेतो तो श्वास खातो तो घास फक्त उगले उबाळेचे पाचही बोटं तुपात त्यामुळे पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज सुखात?

- डी वाय एस पी विश्वंभर गोल्डे  हे पोलीस ठाण्याचे अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे हनुमंत उगलेवर निलंबनाची कारवाई कधी करणाऱ्या ?
- डीवायएसपी विश्वंभर गोल्डे या  प्रकरणात दोषी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करू नका?
- कथित सामूहिक लैंगिक अत्याचारातील गुन्हा व दोषी पोलीस कर्मचाऱ्यांची चौकशी डी वाय एस पी यांनी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे का दिली?
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज फौजदार रमेश उबाळे पोलीस कर्मचारी हनुमंत उगलेची चौकशी होम टी वाय एस पी कस्तुरे यांच्याकडे?
- पेठ बीड चे पोलीस निरीक्षक शुक्रवारी रजा घेतात तरीही त्यांची गैरहजेरी नसते का?
- पेठ बीड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पोलीस निरीक्षक बीडचे अशोक मुदिराज यांचे विश्वासू कर्मचारी हात सफाईत मध्ये नंबर एकच काम करू लागले?
- पेठ बीड पोलीस ठाण्यातून उबाळे उगलेना पाठीशी घालणारे
- पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज निलंबित करा?
- पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराव पोलीस अनेक गुन्हेगारी क्षेत्रातील लोकांशी उठ बैठक करून पाहुणचार करून घेतात
- तरीही  डि वाय एस पी साहेबांच्या डोळ्यावरची पट्टी निघेना झाली?
- डीवायएसपी विश्वंभर गोल्डे करून अशोक मुदिराज हनुमंत उगले रमेश उबाळेला वाचविण्याचे प्रयत्न का?
- गांधीनगरची बीट हनुमंत उगले ला देऊन पोलीस निरीक्षक पेठ बीडचे स्वतःचा फायदा करून घेऊ लागले का?
- पेठ बीड पोलीस ठाण्याच्या हद्दीत टिप्पर ट्रॅक्टर दारूच्या गाड्या सह वेगवेगळ्या प्रकरणात उगलेचे पाची बोटं तुपात त्यामुळे अशोक मुदिराज आहेत सुखात?





# पेठ बीड ठाण्यात नंगानाच
## हजारो लिटर दारू ताडीं शिंदी  गांजा   पत्याचे क्लब पेठ बीड पोलीस ठाण्याच्या गांधीनगर बीट उगलेच्या नावावर चक्री कलर मटका?

**विश्वंभर गोल्डे उघडा डोळे बघा नीट पीडित मुलीचा व्हिडिओ पहा दगडालाही पाझर फुटेल तुम्ही व्हिडिओ पहा व कर्मचारी असो या पी आय असो व्हिडिओ पहा तुम्ही कोणालाही पाठीशी घालणार नाहीत अशी समाजाला नाही नागरिकांना खात्री आहे**

**पीडित भोळसर मतिमंद अत्याचारित मुलीच्या प्रकरणांमध्ये थुक्याला थुका लावू नका लावल्याने कारवाई करावी अशी मागणी होऊ बार्शी नाका परिसरातील पेठ बीड हद्दीमधील नागरिकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे विशंभर गोरडे साहेब कारवाई करा या प्रकरणांमध्ये जे दोषी असतील त्यांना सजा झालीच पाहिजे त्यामध्ये कर्मचारी आहेत त्यांनाही पाठीशी घालू नका आणण्याचा आम्हाला रस्त्या उतरावे लागेल अशी जोरदार चर्चा पेठ बीड हद्दीमध्ये रंगू लागली आहे?**

पेठ बीडच्या गांधीनगर मध्ये हनुमंत उगले नावाच्या पोलिस कर्मचाऱ्याला संबंधित बीट देण्यात आलेली आहे हा पोलीस कर्मचारी वादग्रस्त असताना आरेरावीची भाषा महिलांना अरेरावी पुरुषांना अरेरवीची भाषा दोन नंबर वाल्यांना आपल्या गाडीवर बसून स्वतःच्या  फोर व्हिलर गाडीमध्ये बसून फिरवतो अशी पूर्ण  करून घेतो हा पोलीस कर्मचारी पूर्ण पेठ बीड मध्ये वादग्रस्त आहे या अगोदर सुद्धा हनुमंत उगले या पोलिसाला गेवराई येथील कोरोना काळामध्ये बीड व जालन्याच्या जिल्हा बॉण्ड्री वरती ड्युटीवर असताना याने काय कारणामे केले आहेत लक्ष्मी दर्शन घेऊन व त्यावेळी खूप मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शन केल्यामुळे तत्कालीन एसपींनी त्याला मुख्यालयाला अटॅच केले होते परंतु हनुमंत उगले ने आपल्या वरिष्ठांना लक्ष्मी दर्शन करून वरिष्ठांना मोहमाया करत जमा केलेले त्यांना देऊन परत पेठ बीड पोलीस स्टेशन घेतले अशी चर्चा सध्या शहरांमध्ये जोरदार चालू आहे.?

मुदिराजचा मोदक उगलेसह अन्य विश्वासूंच्या आशीर्वादाने पेठ बीड ठाण्यात आहे अशोक मुदिराज सांगत आहे मला वरिष्ठांनाही सांभाळावा लागत आहे मी राईस प्लेट खाऊन असे दिवस काढतो तसे दिवस काढतो नाहीतर मला पेठ बीड पोलीस ठाण्यात काहीच इंटरेस्ट नाही परंतु वरिष्ठांनी मला विनाकारण पेठ बीड पोलीस स्टेशनची इच्छा नसतानाही दिले आहे अशी कर्मचाऱ्यांजवळ बीड पोलीस ठाण्यात चर्चेला उदान?

पेठ बीड पोलीस स्टेशनला लागलेली कीड  डि वाय एस पी विश्वंभर गोल्डे साहेब एकदा काढूनच टाका पोलिसांची प्रतिमा मल्लीन होत आहे ते एकदा स्वच्छ कराच जर तुम्ही नाही केली तर आम्हाला परिस्थिती मार्फत आवाज उठवून तक्रार करावी लागेल प्रसिधीमुळे न झाली तर पब्लिकला घेऊन रस्त्यावर उतरावं लागेल अशी वेळ येऊ देऊ नका?

बार्शी नाका चौकामधून जात असलेला इमामपूर रस्ता रस्त्याच्या समोरच नव्हे तर रस्त्यावर महाराष्ट्र



मध्ये शिंदेचे झाडं नाहीत तरीही इमामपूर रोडला हजारो लिटर शिंदीं ताडी  येथे कुठून येत आहे व खुलेआम विक्री चालू आहे याच्यावर कोणाचाही नियंत्रण नाही, बीट अमलदार सध्या झोपेमध्ये आहे त्या बीट अंमलदाराची झोप कधी जाईल किंवा कधी त्याचे डोळे उघडतील अशी चर्चा रस्त्यावरून येणारा जाणारा नागरिक करत आहे कारण की त्या रस्त्याने महिलांची रहदारी असते त्याच ठिकाणी नशा करून लेझीम खेळणारे नसेबहादर यांच्यापासून होणारा त्रास कधी थांबणार याकडेही पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांचेही लक्ष नाही व संबंधित अंमलदार एक तारीख ते एक चक्कर मारत आहे आत मध्ये चक्कर मारायला त्यांना वेळ नाही का बार्शी नाक्यावरील चौकी कधी चालू होतं कधी बंद असते गजबजलेला चौक असतानाही कधी कोणाचे काय घडेल काही सांगता येत नाही तरीपण बार्शी नाका चौकीला सदा कुलूप असते त्यामुळे लोकांच्या समस्या कोणाकडे मांडाव्यात आणि काय करावे हेच कळत नाही तरीही पी आय अशोक मुदिराज यांचे डोळे उघडत नाहीत त्यामुळे नागरिकांमध्ये सध्या जोरदार चर्चा चालू आहे की चौकी  ही निस्ती नावाला चौकी आहे की काय?

पेठ बीड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज यांचे भालदार चोपदार यांच्यावरच पीआय अशोक मुदिराज  यांचे सर्व काही चालते स्वतः भालदार चोपदार सांगतात की जेव्हा आम्हाला आमचे साहेब सांगतात तेव्हा आम्ही करतो तरीही विशंभर गोल्डे आपण बार्शी नाक्यावर येऊन चौकामध्ये एक चक्कर मारा तुम्हाला याचं कुणाचंही ऐकायची गरज लागणार नाही स्वतः तुम्ही तुमच्या डोळ्याने पहा आणि नंतर कारवाई करा मग नागरिकांचे म्हणणं आहे की जे काय चालतंय ते वरिष्ठांच्या आशीर्वादाने चालू आहे त्यामुळे कारवाई होत नाही अशी चर्चा पेठ बीड हद्दीमध्ये जोरदार चालू आहे डी वाय एस पी विश्वंभर गोल्ड तुम्ही पेठ बीडमध्ये एकदा चक्कर मारून पहाच?

# अनुसूचित जाती जमातींवर अन्याय करू नका. नितीन जायभाये

बीड (प्रतिनिधी)

आज ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ९ ऑगस्ट रोजी, जिल्हाधिकारी बीड यांना लोकप्रिय समाजसेवक तथा ओबीसी जनमोर्चाचे युवानेते व बीड विधानसभा मतदारसंघाचे प्रमुख नितीन जायभाये तसेच लोकशाही पत्रकार संघाच्या सुवर्णाताई चव्हाण, राणीताई गुलरुखजहीन शेख यांच्या नेतृत्वाखाली अनेक मान्यवरांच्या समवेत अनुसूचित जाती जमातींच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. विश्वातील सर्वात मोठ्या या सार्वभौम पूर्ण लोकशाही भारत देशाच्या आज राष्ट्रपती ह्या, माननीय आदरणीय द्रौपदी मुर्मू देखील अनुसूचित जाती जमातींमधूनच जन्म घेऊन आलेल्या आहेत हे विसरू नका. असे प्रतिपादन नितीन जायभाये यांच्या वतीने यावेळी करण्यात आले.

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून आदिवासी ठाकूर ठाकर जमातीला जात वैधता प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी अन्याय होत आहे. त्यामुळे बीड शहरातील सकल (अनुसुचित जाती - जमाती) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करून व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरूनच सकल समाजाच्या वतीने निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती जमातीच्या आरक्षणामध्ये वर्गीकरण न करता एक तज्ञ लोकांची अभ्यास समिती नियुक्त करण्यात यावी महाराष्ट्र राज्यातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करून त्याविषयीचा अहवाल तयार करून सर्व निकष सादर करण्यात यावेत अनुसूचित जाती जमातीच्या लोकांचे मतं आणि गरज जाणून घेण्यात यावी आणि त्यानुसार अहवाल तयार करण्यात यावेत. लोकाची मतं आणि गरज लक्षात घेऊन अंमलबजावणी करण्यात यावी. आम्ही सर्व खालील स्वाक्षरी करणार अनुसुचित जाती जमाती आदिवासी ठाकूर ठाकर जमातीतील जमात बांधव गेल्या अनेक वर्षापासून आम्हाला जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी शासनाच्या वतीने अन्याय करण्यात येत आहे. आमच्याकडे अनेक महसुली व शैक्षणिक पुरावे असताना जाणीवपूर्वक सदरील प्रमाणपत्र न देण्याचा शासनाचा हेतू दिसून येतो.

तरी खालील मागण्या शासन स्तरावर मान्य करण्याच्या हेतूने आज रोजी आम्ही आपणास निवेदन सादर केले .याबाबत सदरील निवेदनाची आपण शासनाला शिफारस करून मागण्या लवकरात लवकर




मंजूर करण्यात याव्या अन्यथा आम्हा जमात बांधवांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करून शासनाला जागी करावे लागेल व याबाबत घडणाऱ्या अनुचित प्रकारास प्रशासन जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी. आदिवासी ठाकूर ठाकर जमातीच्या प्रमुख मागण्या आहेत. १९५० पूर्वीच्या पुराव्याची अट शिथिल करण्यात यावी. क्षेत्र बंधन कायदा १०८/७६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. चालीरीती परंपरांमध्ये बदल झाल्याने पडताळणी समितीने हा विषय गृहीत धरू नये.शासन निर्णयानुसार विशिष्ट कालावधीतच जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे.जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेले प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात यावे. अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समीती बरखास्त करून उपविभागीय अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्रच जात वैधता प्रमाणपत्र गृहीत धरण्यात यावे.कुटुंबातील एक वैद्यता मिळाल्यानंतर पुढील प्रकरणात कोणतीही चौकशी न करता त्या कुटुंबातील व्यक्तीला सरसकट वैधता देण्यात यावी. अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. शिष्टमंडळाचे नेतृत्व नितीन जायभाये यांच्यासह सुवर्णा चव्हाण, वसंत चव्हाण, राजेंद्र जाधव, केशव ठाकूर, डॉ. अशोक मसलेकर एम.डी. चव्हाण, सूर्यकांत जोगदंड, राजेंद्र जाधव, गणेश खेमाडे, शेख अमेर पाशा, शाहीर पठाण, शेख राणी शेख गुलरुख जहीन, शकुंतला गुघासे, स्नेहा खंडागळे आदी उपस्थित होते.

## प्रा.ज्ञानेश्वर राऊत यांनी बिड - नाळवंडी रस्त्या मध्ये झालेल्या गुडघ्या एवढ्या

# खड्ड्यात बसून दिला आत्मदहनाचा इशारा

नाळवंडी (प्रतिनिधी)

बिड शहरापासून साथ किलोमिटर अंतरावर असलेल्या नाळवंडी गावच्या रस्त्याची अवस्था गटारी सारखी झालेली आहे,या रस्त्यावर हजारो खड्डे कमरा एवढे खोल झालेले आहेत आणि त्यातून लोकांना प्रवास करावा लागत आहे,या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अनेक लोकांचे जीव धोक्यात आलेले आहेत,तरीही इथल्या प्रस्थापितांचं आणि प्रशासनाचा आणि लोकप्रतिनिधींचा या रस्त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष आहे का तर या रस्त्यामध्ये यांना कवडीही मिळणार नाही म्हणून,या रस्त्या साठी प्रा.ज्ञानेश्वर राऊत यांच्या मार्फत अनेक मोर्चे काढण्यात आली,शेकडो निवेदने देण्यात आली तरी मात्र इथल्या राजकारण्यांना प्रशासनाला घंटा फरक पडला नाही,त्याच्यामुळे संपूर्ण गावकरी आक्रमक होऊन प्रा.ज्ञानेश्वर राऊत यांच्या माध्यमातून काल दि.८/८/२०२४ वार:गुरुवार या दिवशी जिल्हा अधिकारी कार्यालय येथे या रस्त्याच्या बाबतीत निवेदन देण्यात आले या निवेदनाद्वारे असे कळविण्यात आले की १५ ऑगस्ट या दिनाच्या अगोदर सरकार,प्रशासन यांनी रस्त्याच्या बाबतीत तातडीची भूमिका न घेतल्यास १५ ऑगस्ट या दिवशी स्वतःला जिल्हाधिकारी कार्यालय समोर जाळून घेणार असे या निवेदनात नमूद करण्यात आले,त्याच अनुषंगाने आज



प्रा.राऊत यांनी नाळवंडी रस्त्यात तयार झालेल्या गटारीत बसून या सरकारला,प्रशासनाला,आणि इथल्या प्रस्थापितांना इशारा दिला,सरकार आणि प्रशासनाने या रस्त्याची दखल न घेतल्यास,आणि हा रस्ता तयार करून देऊ असे लेखी आश्वासन दिल्या शिवाय आंदोलन माघे घेणार नाही. १५ ऑगस्ट च्या दिवशी राऊत यांच्या जीवितास काही हानी झाल्यास तर याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची आणि प्रशासनाची राहील अशी ग्वाही राऊत यांनी माध्यमांशी बोलताना या वेळी दिली.

# अधिकारी, इंजिनिअर, गुत्तेदार आता तुमची खैर नाही!

## जलजिवन प्रकरण आता थेट मंत्रालयात ;न्यायालयात दाद मागणार-विशाल सराफ

बीड (प्रतिनिधी)

जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या कामात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात आलेला आहे.धारूर तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणात भष्टाचार झाला आहे.धारूर तालुक्यातील गोपाळपुर ग्रामपंचायत अंतर्गत होत असलेल्या जलजीवन मिशन योजनेत देखिल कोट्यावधीच्या कामातही सध्या तसाच बोगसगिरीचा प्रकार सुरू आहे हे सगळं माहित असतानाही याकडे मुकुंद आंधळे कार्यकारी अभियंता(प्र)ग्रामीण.पाणीपुरवठा.विभाग, जि.प,बीड व ए.एस.शेख उप अभियंता, ग्रामीण.पाणीपुरवठा विभाग.जि.प बीड, धारूर तालुका अधिकारी, धारूर तालुक्यातील जलजिवनचे इंजिनिअर कुंभार चौकशी करून यांच्यावर निलंबनाची कारवाईसह अनेक प्रश्न सोडविण्याची मागणी विशाल सराफ यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली आहे. अन्यथा मंत्रालय कार्यालय समोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत जलजीवन मिशन पाणीपुरवठा योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करण्यात येत असून भ्रष्टाचाराची उच्चस्तरीय चौकशी करून भ्रष्टाचार करणाऱ्या दोषी अधिकारी कर्मचाऱ्यावर व गुत्तेदारावर इंजिनिअर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.जलजिवनच्या कामाचा बीड जिल्ह्यात बोगस गिराचा डंका वाजत असताना मुकुंद आंधळे कार्यकारी अभियंता(प्र)ग्रामीण.पाणीपुरवठा.विभाग, जि.प,बीड व ए.एस.शेख उप अभियंता, ग्रामीण.पाणीपुरवठा विभाग.जि.प बीड व संबंधित अधिकारी बीड जिल्ह्यातील गुत्तेदार पोषण्याचे काम करत आहेत, व होत असलेल्या जलजीवन योजनेमध्ये भष्टाचार्यारा कडे दुर्लक्ष करत आहेत.त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी.तसेच धारूर तालुक्यातील जलजिवनचे इंजिनिअर कुंभार, धारूर तालुका अधिकारी यांची चौकशी करून दोषी आढळल्यास कारवाई करण्यात यावी.पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे विशाल सराफ यांनी मागणी केली आहे.अन्यथा मंत्रालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असलेला इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.विशाल सराफ पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते , हनुमंत तोंडे प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस,बीड यांच्या निवेदनावर साक्षर्या आहेत.

**पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे अधिकारी, इंजिनिअर निलंबित करण्यासह चौकशीची विशाल सराफ यांची मागणी**

अन्यथा मंत्रालयासमोर आमरण उपोषणाचा निवेदनाद्वारे इशारा; संबंधितांना न्यायालयात यावेच लागेल

### फसवणूकीचा गुन्हा दाखल करा..

गोपाळपूर जलजिवनचे देयके अदा न करण्यात यावे.संबंधित अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी.गोपाळपूर जलजिवनच्या संबंधित इंजिनियर, गुत्तेदारावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा.संबंधित सह्याद्री कंट्रक्शन चे शासकीय लायसन रद्द करण्यात यावे.गोपाळपूर जलजिवनची पाईपलाईन इस्टिमेट प्रमाणे नसून एक मीटर खोलीकरण नसल्यामुळे संपूर्ण पाईपलाईन करून दाखवण्यात यावे.गोपाळपूर जलजिवनची विहीर बांधकाम व पिण्याच्या पाण्याची टाकी वाळू येवजी विको चा वापर करून बांधण्यात येत आहे त्यामुळे तात्काळ बांधकाम थांबवण्यात यावे.पाणीपुरवठा विभागाचे, जलजीवनच्या संबंधित जिल्हा परिषद बीड चे अधिकारी निलंबित करण्यात यावे.अशी मागणी निवेदनाद्वारे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे केली आहे.

# केतुरा येथील शेतकऱ्याची मुलगी झाली पोलीस

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील केतुरा येथील लोकनियुक्त सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांची पुतणी ,सुजाता बंडू तळेकर या विद्यार्थिनीच प्राथमिक शिक्षण श्री नगद नारायण विद्यालय नारायणगड या ठिकाणी झालं, व बारावीपर्यंत शिक्षण गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी या ठिकाणी झालं, शिक्षण झाल्यानंतर सुजाताने ठरवलं की मला पोलीस व्हायचं, घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्यामुळे, आई वडील शेतामध्ये काम करतात, मग मुलीने ठरवले की आपण घरीच अभ्यास करायचा, पुढचं स्वप्न जिद्द मेहनत संघर्ष या मुलीने, आपल्या आई-वडिलांसमोर ठेवून एक नवी उमेद संघर्ष या हेतूने तिने अभ्यास केला ,मुलीने पोलीस भरतीच्या माध्यमातून अखेर मुलगी पोलीस भरतीमध्ये या यशाच्या शिखरावर आई-वडिलांचे स्वप्न या मुलीने साकर केले,

**सुजाता तळेकर हिने घरी बसून केला अभ्यास आई-वडिलांचे केले स्वप्न साकार, परमेश्वर नाना तळेकर**



केतुरा येथील सरपंच उपसरपंच संघटना महाराष्ट्र राज्य मुंबई जिल्हाप्रमुख बीड. तथा केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी या मुलीचा सत्कार केला, व पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या, यावेळी उपस्थित, अशोक गव्हाणे, रामेश्वर चाळक, संदीप कोकट, विशाल लोणकर, अशोक फड, रामनाथ गव्हाणे, बाळासाहेब सांगूळे गणेश तळेकर, निलेश ससाने, अक्षय गवते, बाळू गायकवाड, गोविंद तळेकर, नारायण तळेकर, आदी उपस्थित होते

# एआयसीचा गेवराईच्या ३१ हजार शेतकऱ्यांना दणका; शेतकरी विम्यापासून राहणार वंचित




गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : मागील वर्षी जवळपास ७७ हजारांहून अधिक गेवराई तालुक्यातील शेतक-यांनी खरिप पिकाचा विमा उतरून घेतला. अत्यल्प पाऊस अन् नोव्हेंबर महिन्यात झालेला अवकाळीने कपाशीचे नुकसान झाले होते. या अनुषंगाने विमा कंपनीकडे ऑनलाईन तक्रारी साधारण ५६ हजार शेतक-यांनी केल्या. मात्र, भारतीय कृषी विमा कंपनी (एआयसी) ने फक्त २५ हजार शेतक-यांच्या तक्रारी मान्य केल्या असून, उर्वरित ३१ हजार शेतक-यांच्या तक्रारीला एआयसीने नकारघंटा दिली आहे. वर्षानुवर्ष निसर्ग कोपत चालला आहे. यामुळे शेती व्यवसाय संकटात सापडत चालला आहे.खर्च लाखात अन् उत्पन्न हजारात अशी परिस्थितीने शेतकरी हतबल होत आहेत. त्यातच मागील वर्षांपासून राज्य शासनाकडून एक रुपयात पिकविमा ही योजना राबविण्यात आली.

पहिल्याच वर्षी गेवराई तालुक्यात जवळपास ७७ हजारांहून अधिक शेतक-यांनी गतवर्षी कापूस, सोयाबीन, मुग, तुर, कांदा, भुईमूग, उडिद अदी खरिप पिके नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यात आली. दरम्यान, मागील वर्षी झालेला अत्यल्प पाऊस अन् नोव्हेंबर महिन्यात झालेला अवकाळी यामुळे गेवराई तालुक्यातील पिक विमा भरणा केलेल्या ७७ हजार शेतक-यापैकी ५६ हजार ६६४ शेतक-यांनी ७२ तासाच्या आत भारतीय कृषी विमा कंपनीकडे ऑनलाईन तक्रारी केल्या. मात्र, विमा कंपनीकडून विविध कारणे समोर करत फक्त २५ हजार ५५० शेतक-यांच्या तक्रारीला हिरवा कंदील दिला तर, उर्वरित ३१ हजार शेतक-यांच्या तक्रारीला केराची टोपली दाखवल्याने सदरील शेतकरी पिकविम्यापासून वंचित राहणार आहेत.

### शेतकऱ्यांवर अन्याय!

सोयाबीन पिकाचे अग्रीम दिल्याने कापूस पिकाचा २०२३ पिकविमा मंजूर झाल्याचे शेतकरी सांगतात.तालुक्यातील काही महसूल मंडळातील शेतक-यांच्या खात्यात पिकविमा रक्कम जमा झाल्याचे शेतकरी बोलतात. तसे पाहीले तर गतवर्षी विमा कंपनीकडून गेवराई तालुक्यातील ५६ हजार शेतक-यांनी ऑनलाईन तक्रारी केल्या असताना २५ हजार ५५० शेतक-यांच्या ऑनलाईन तक्रारी मान्य केल्याने विमा मिळण्याचा मार्ग सुकर झाला असून, एआयसीने ३१ हजार शेतक-यांच्या ऑनलाईन तक्रारी अमान्य केल्याने विमा कंपनीकडून अन्याय झाल्याचे डॉ. उध्दव घोडके यांनी सांगीतले.

# साहेब, तुम्ही मला फक्त लढ म्हणा-प्रा.ईश्वर मुंडे

पुणे (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणूक जशी जशी जवळ येत आहे तशी तशी सर्व पक्ष आणी संभाव्य उमेदवार कामाला लागलेले आहेत. खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून बीड जिल्हा परिषद अंतर्गत नौकरीचा स्वेच्छा राजीनामा देवून पक्षात सक्रीय कार्यरत असलेले व बीड लोकसभेसाठी जनतेच्या पसंतीला उतरलेले प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्या पुणे येथील मोदीबाग निवासस्थानी भेट घेऊन आपले पक्ष व सामाजिक कार्य सांगून माजलगाव विधानसभा निवडणूकीसाठी मला तिकीट देवून साहेब, तुम्ही मला फक्त लढ म्हणा..माजलगाव विधानसभा पक्षाचे सर्व कार्यकर्ते व सुजान मतदार यांच्या आशिर्वादाने आपणास जिंकून देवू असा आत्मविश्वास खा.शरदचंद्र पवार यांना प्रा.ईश्वर मुंडे यांनी दिला आहे.



माजलगाव विधानसभेसाठी खा.शरदचंद्र पवार यांच्याकडे तिकीटाची मागणी

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महिलांच्या सोयीस्कर बालाघाटच्या डोंगरांगात आयोजित कॅम्प

वडवणी (प्रतिनिधी)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, यासाठी संपूर्ण महाराष्ट्र मध्ये महिलांची धावपळ चालू आहे. काही महिलांना त्रुटी येत आहेत तर काहींना तहसीलच्या व चकरा माराव लागत आहेत. ग्रामीण भागातील महिलांना शहराच्या ठिकाणी जाऊन फॉर्म भरणे शक्य नाही त्यामुळे बालाघाटच्या डोंगरांगात वसलेल्या

रूई पिंपळा, या गावातील पात्र महिलांना सोयीस्कर सर्व महिला २१ ते ६५ व वर्षापर्यंत मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यासाठी हा सामाजिक उपक्रम. आयोजित केला आहे. या कॅम्पमध्ये ग्रामपंचायत कार्यालयाकडून जागेवरच सर्व ऑफलाईन व ऑनलाईन प्रकारे फॉर्म भरून दोन्ही करण्यात येईल. यास आयोजित कॅम्प मध्ये माननीय सरपंच माननीय ग्रामसेवक सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस आशाताई ऑपरेटर सर्व टीम उपस्थित आहे. यामध्ये ग्रामीण भागातील महिलांना खूप मोठ्या प्रमाणावर फायदा झालेला आहे.

**सरपंच मयूर आंधळे यांचा ग्रामीण भागात सामाजिक उपक्रम**



# गेवराई तालुक्यातील दुष्काळी गावांना कधी भेटणार पाणी :बाळासाहेब सोलंकर

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यामधील गेवराई तालुका हा 'जायकवाडी प्रकल्प व गोदावरी नदी या पासून खूप जवळ आहे, तरी देखील गेवराई मधील काही गाव पाण्यापासून वंचित आहेत. या गेवराई तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर ऊसतोड कामगाराची लोक आहेत ,या भागातील लोकांना जमिनी भरपूर आहेत परंतु मुबलक पाणी नसल्यामुळे येथील लोकांना ऊस तोडायला बाहेर गावी जावं लागतं. येथील ऊसतोड कामगार बाहेर जात असल्यामुळे त्यांच्या मुलांना एका ठिकाणी शिक्षण घेता येत नाही. स्थानिक प्रतिनिधींनी लक्ष घातलं असतं तर हा तालुका दुष्काळ मुक्त झाला असता. तिथल्या दुष्काळी भागातील गावांना मुबलक पाणी आलं असतं. परंतु इथल्या स्थानिक प्रतिनिधी पूर्णपणे अपयशी ठरलेले आहेत . येथे एम.आय.डी.सी आले असत्या इथे पाणी आलं असतं.मोठमोठे कारखाने आले असते. परंतु स्थानिक प्रतिनिधी कधीच या प्रश्नावरती बोलायला तयार नाहीत. इथल्या स्थानिक प्रतिनिधींनी या गेवराई तालुक्यातील दुष्काळी गावांना पाणी आणण्यासाठी काही प्रयत्न केले तर नक्की ह्या गेवराई तालुका दुष्काळ मुक्त होऊ शकतो. परंतु स्थानिक प्रतिनिधीचे लक्ष नसल्यानेच या गावांना पाणी भेटत नाहीं, इथल्या तरुणांना काम भेटत नाही, चांगल्या प्रतीचे शिक्षण भेटत नाही. मित्रांनो आगामी काळात तुम्ही आमदार म्हणून गेवराई तालुक्यातून मला निवडून द्या मी तुम्हाला



तालुका दुष्काळमुक्त त्याचबरोबर इथल्या तरुणांना काम भेटल.

# अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण

## सोळ्यास नाथ मंदीर येथे रविवार पासून प्रारंभ

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

धारूर येथील नाथ महाराज मंदिर येथे रविवार दि.११ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा प्रारंभ होत आहे.काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, रामायण कथा, हरिपाठ, संगीत भजन, हरीगजर या भरगच्च धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे या सप्ताहाचे काल्याचे श्री.ह.भ.प गुरुवर्य अशोक महाराज पांचाळ आळंदी देवाची यांचे होणार आहे तरी या सप्ताहाचा भाविक भक्तांसह नागरिकांनी लाभ घ्यावा असे आव्हान श्री नाथ महाराज सेवा समिती धारूर यांनी केले आहे

नाथ महाराज मंदिर या ठिकाणी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळाचे आयोजन करण्यात आले.दि. ११ ऑगस्ट पासून प्रारंभ होत आहे या कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे सकाळी पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ७ ते १० विष्णू सहस्त्रनाम व ज्ञानेश्वरी पारायण, १० ते २ भोजन व विश्रांती, २ ते ६ रामायण कथा, ६ ते ७ हरिपाठ, ७ ते ९ भोजन व विश्रांती, ९ ते ११ किर्तन व नंतर संगीत भजन व हरीगजर होणार आहे.यात प्रथम दिवशी दि.११ रोजी श्री ह.भ.प.दीपक महाराज मेटे, दि.१२ श्री ह.भ.प शिवानंद गिरी महाराज अंबाजोगाई, दि.१३ श्री ह.भ.प शिवाजी महाराज मुळे, दि.१४ श्री ह.भ.प पांडुरंग महाराज मुंडे जा-मोहा, दि.१५ श्री ह.भ.प साक्षीदीदी येवले आळंदी देवाची, दि १६ श्री ह.भ.प प्रतिभाताई गायकवाड, दि.१७ श्री ह.भ.प तुकाराम महाराज शास्त्री आळंदी देवाची या कीर्तनकारांची कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे तर दि. १८ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री ह.भ.प. गुरुवर्य आशोक महाराज पांचाळ आळंदी देवाची त्यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होणार आहे व नंतर महाप्रसाद होणार आहे. तरी या कीर्तन सोहळ्यास भाविक भक्तांसह नागरिकांनी त्या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री नाथ सेवा समिती धारूर यांनी केले आहे.



पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी पदभार स्वीकारत नंदकुमार ठाकूर साहेब यांच्याकडून पदभार देण्यात आला आज रोजी बीडला नव्याने पोलीस अधीक्षक हे रुजू झाले आहेत बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या वतीने त्यांच्यावरती शुभेच्छांचा स्वागत चा वर्षा होत आहे

# बालरंगभूमी परिषदेच्या बीड शाखेतर्फे छत्री रंगवा महोत्सवाला उदंड प्रतिसाद

## बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी चित्र निर्माण होण्यासाठी हा उपक्रम -डॉ.दीपा क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

बालकांच्या भावविश्वात रंगी बेरंगी चित्र निर्माण व्हावे, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, रंगाशी खेळता यावे यासाठी छत्री रंगवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात प्रशिक्षण देवून स्पर्धा घेत बालचित्रकारांचा उत्साह वाढवला. तब्बल १०० बालचित्रकारांनी स्वतः छत्री रंगवली आपल्या कल्पनेतील चित्र त्यांनी रंगवले, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

बीड शहरातील के.एस.के. महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमाचे उद्घाटन दोन बालकांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितीत नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, डॉ.सुधाकर गुट्टे डॉ.नारायण काकडे, प्रा.जालिंदर कोळेकर, डॉ.खान अन्सार उल्ला शफिउल्ला, डॉ.दुष्यंता रामटेके, मिलींद शिवणीकर, इंजिनिअर संतोष सानप, मुख्य प्रशिक्षक अमित गाडे, नामदेव साळूंके, डॉ.अनिता शिंदे, सुरेश साळूंके, श्रीकांत पुरी आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, बालकांच्या जीवनात रंगीबेरंगी रंगाचे भावविश्व निर्माण करण्यासाठी यासारख्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून आज मोबाईलच्या युगात मुलांच बालपण हिरावून गेले असून त्यांच्या नृत्य, नाट्य, संगीत, खेळणे बागडणे हे हरवले जात आहे. त्यामुळे मुलांच्या गुणांना वाव देण्यासाठी अशा स्पर्धा आयोजित





करणे आवश्यक आहे. लहान मुलांचे जग सोनेरी, आनंदी होणे यासाठी छोटया चित्रकारांना पेंटिंगमधून त्यांच्या कला गुणांना, कल्पनेला वाव मिळेल यासाठी या स्पर्धेतून सहभागी बालकलावंताना बक्षीस दिली गेली. परंतु खर्या अर्थाने या स्पर्धेत सहभागी करून घेणे हे त्यांच्यासाठी मोठे बक्षीस मिळाल्यासारखे आहे. शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यातील शाळा गुरूकूल इग्लींश स्कूल, पोतदार इनटरनॅशनल स्कूल, खांडेपारगाव हायस्कूल, चंपावती शाळा, चंपावती इंग्लिश स्कूल, संस्कार विद्यालय, नारायणा स्कूल, शिवाजी विद्यालय, भगवान विद्यालय, भगवान इंग्लिश स्कूल, माऊली प्राथमिक शाळा, पिंगळे विद्यालय, संभाजी विद्यालय, सैनिक स्कूल बीड, बोरफडी हायस्कूल बोरफडी, रामतिर्थ हायस्कूल, हजरत बालेपीर उर्दू स्कूल आदी शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले. याशिवाय वैयक्तीक बालचित्रकार देखील उपस्थित होते. या महोत्सवात प्रथम- आदित्य शंकर चव्हाण संस्कार विद्यालय बीड, द्वितीय-श्रावणी संतोष गोरे संस्कार विद्यालय बीड, तृतीय-मैथिली मिलींद शिवणीकर नारायण इ.टेक्नो.स्कूल ७ वी, उत्तेजनार्थ - प्रियल प्रविण ढगे पोदार स्कूल, काझी सिध्दीकी हजरथ बालेपीर, आदिती अभिषेक देशमाने पोदार स्कूल, श्रेयस राऊत, समृध्दी श्रीकांत साळूंके गुरूकुल स्कूल, कामरान हसन सैनिकी विद्या, अनघा रविंद्र आदे चंपावती विद्यालय, दिप्ती दिपक राऊत चंपावती विद्यालय यांना नवगण शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या हस्ते बक्षीसाचे वितरण करण्यात आले. तसेच, रंगवलेल्या छत्र्या व सर्वांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. या महोत्सवात एकूण शंभर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक म्हणून समीक्षा राऊत, शर्वरी जोगदंड, तनिषा हिरण, साक्षी सपकाळ, गायत्री जव्हेरी, शिवाणी वरपे, पल्लवी स्वामी, मानस गुळवेलकर, किरण वाघमारे, जानवी गालम, अतुल चौरे, ऐश्वर्या साळूंके, बाळासाहेब कांबळे यांनी विद्यार्थ्यांना कार्यशाळेतून चित्र काढण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बालकलावंत, पालक उपस्थित होते.

# माजीमंत्री क्षीरसागर यांचा ग्रामीण भागात झंझावात

बीड (प्रतिनिधी)

माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी बीड विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने बीड मतदारसंघात संपर्क दौरा सुरु केला आहे. मागच्या दोन दिवसात त्यांनी रायमोहा, लिंबागणेश आदी गटांमधील सुमारे २९ गावांना भेटी दिल्या आहेत. गेल्या महिनाभरात प्रत्येक सर्कल त्यांनी पिंजून काढला आहे,आतापर्यंत त्यांनी २०० गावांना भेटी दिल्या आहेत,आजच्या या दौऱ्यामध्ये ते नव्या जुन्या कार्यकर्त्यांसोबत संवाद साधत आहेत . त्यांच्या संपर्क दौऱ्याल उत्तम प्रतिसाद मिळत असून काही गावांमध्ये तर त्यांचे डफडे वाजवून स्वागत होत असल्याचे चित्र आहे.लोकसभा निवडणुकीदरम्यान बीडमधील राजकीय , सामाजिक वातावरण ढवळून निघाले होते. त्याचे सामाजिक पडसाद अजूनही अनेक ठिकाणी उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आता संपर्क दौऱ्याला सुरुवात केली आहे. ग्रामीण भागात जाऊन नव्या जुन्या कार्यकर्त्यांच्या भेटी घेणे, छोटेखानी बैठकांमधून त्या गावात काय



## गावागावात जल्लोषात स्वागत तर मतदारांशी संवाद

विकासकामे झाली, काय राहिली याची चर्चा करणे आणि विधानसभेच्या आगामी निवडणुकांच्या संदर्भाने चर्चा करणे असा कार्यक्रम मागच्या दोन दिवसात जयदत्त क्षीरसागर यांनी हाती घेतला आहे. त्यांच्या काळात अनेक गावांमध्ये राबविण्यात आलेल्या योजनांची आठवण या निमित्ताने ग्रामस्थ काढतात तसेच काही प्रकल्प अर्धवट राहिले त्याची खंत असून आगामी काळात संधी मिळाल्यास ते पूर्ण करण्याचे आश्वासन जयदत्त क्षीरसागर गावागावात देत आहेत. शुक्रवारी जयदत्त क्षीरसागर लिंबागणेश जिल्हापरिषद गटामध्ये होते. जयदत्त क्षीरसागरांच्या राजकीय जीवनाची सुरुवात जेथून झाली तो हा जिल्हापोरिषद गट असल्याने या गटामध्ये जयदत्त क्षीरसागर यांचे नेते कार्यकर्त्यांशी असणारे संबंध देखील वेगळे आहेत. यातूनच अनेक गावांमध्ये जयदत्त क्षीरसागर यांचे डफडे वाजवून, तोफांची सलामी देत गावात मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.



**दि.०८ ऑगस्ट, पाटील साहेब प्रतिष्ठान अध्यक्ष, रामभाऊ नरवडे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जि. प. प्रा शाळा सुलतानपूर वसाहत येथे विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक श्री गणेश नवले सर, रामभाऊ नरवडे पाटील यांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब आणि छ. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षणप्रेमी एन.पी. नरवडे पाटील, अजित लोखंडे, केशव सोळंके व रोहित गायकवाड यांनी केले. वाढदिवसाला अनावश्यक खर्च टाळून त्यातून समाजसेवा व्हावी आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची उत्सुकता वाढावी. शिक्षणाविषयीचे महत्त्व सांगुन श्री पांचाळ सर यांनी आभार मानले व योग्यरीत्या कार्यक्रम पार पडला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री गणेश नवले सर, श्री बालासाहेब बचाटे सर, श्री जाधव सर, संतोष धिरडे पाटील, डॉ. बादाडे, शेख बकस, अमोल नरवडे, माऊली लोखंडे, गंगाराम पांचाळ,जावेद शेख, कृष्णा इंगोले, नवनाथ ठोंबरे, विष्णू इंगोले व समस्त मित्र परिवार उपस्थित होते.**

# आण्णा संपर्कासाठी पोलिसांचा फौज फाटा...!

## मतदानासाठी बंदुकीचा धाक दाखवणार का ? - नवनाथ शिराळे

बीड (प्रतिनिधी)

सत्तेची प्रचंड लालसा, कायम सामान्य जनतेला गृहीत धरून, काही झाले तरी बुडाखाली सत्तेची खुर्ची पाहिजे ही वृत्ती ठेऊन, राजकारणाचा वस्तुपाठ गिरवणारे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे विशिष्ट ग्रामीण भागातील लोकांचा संपर्क करण्यासाठी पोलीस नियंत्रण पथकाचा पिंजरा घेऊन खेडोपाडी फिरत आहेत. तहयात राजकारण करणाऱ्या जयदत्त क्षीरसागरांच्या व्यक्तीमत्वाला शोभत नाही. संपर्कासाठी एवढा फौज फाटा तर मतदानासाठी बंदुकीचा धाक दाखवणार का ? असा खोचक सवाल भाजपाचे जेष्ठ नेते तथा नगर परिषद माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी उपस्थित केला आहे.लोकसभा निवडणुकीनंतर बीड विधानसभेची लॉटरी पदरात पाडण्यासाठी जयदत्त क्षीरसागर यांनी पोलिसांचा फौजफाटा घेऊन संपर्क दौरा सुरु केला. कोणतीही घटना घडली नसताना काल हिवरसिंगा, मलकाचीवाडी, खोकरमोहा, वंजारवाडी येथील संपर्क दौऱ्यात जयदत्त क्षीरसागर पोलिसांच्या गराड्यात दिसले. यामुळे क्षीरसागरांचे मनोबल खचले हे लक्षात आले. लोकसभा निवडणुकीत ठाम निर्णय न घेता कोणाच्या हातावर कोणती तूर दिली आणि काय दिवा लावला हे लोकांना माहित आहे. ना पक्ष, ना धोरण न बाळगता समाजाला वेढ्यात काढत स्वत:चा राजकीय स्वार्थ साधण्याचा डाव खेळला गेला. वंश परंपरेनुसार राजकारणाचा घाणेरडा कित्ता पुन्हा एकदा गिरवला. जे पेराल ते उगवणारच आहे.



आणि ते पुढे येणार आहे. स्वत:ला स्वयंघोषित विकास पुरुष घोषित करणारे व सर्व समाजाला झुलवत ठेवणारा लबाडीचा चेहरा म्हणून जयदत्त अण्णांचे नाव बीडच्या इतिहासात काळ्या अक्षरात लिहले जाईल यात शंका नाही.आता काळ बदलला राजकारण बदलले, मतदार सुज्ञ झाला. तुमचे खाण्याचे दात कोणते आणि दाखवायचे दात कोणते हे जनतेच्या लक्षात आले. किमान राजकीय सेवा निवृत्तीच्या काळात तरी लोकांना झुलवत ठेऊन, लबाडीचे राजकारण बंद करा असा सल्ला नवनाथ शिराळे यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

# आष्टी पाटोदा शिरुरमध्ये परिवर्तनाचा नवा युवा चेहरा डॉ. महेश थोरवे

## विधानसभेसाठी डॉ. थोरवे यांच्या नावाच्या चर्चेने राजकीय क्षेत्रात बदलाची चाहूल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाकडे उमेदवारीची मागणी

कडा (प्रतिनिधी)

राज्य विधानसभेची घोषणेची वाट पाहत असताना बरेच नवे चेहरे रिंगणात उतरण्यास इच्छुक आहेत. प्रत्येक मतदार संघांमध्ये कृतिशील नवे चेहरे या निवडणुकीचे वेगळेपण राहू शकते. तसेच सर्व राजकीय पक्ष उमेदीच्या नवीन नेतृत्वाचा शोध घेत आहेत. त्यातच बीड जिल्ह्यातील आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातून उच्च शिक्षित, समाजाची जाण असलेले आणि राजकारणाची समीकरणे बदलण्याची धमक असणारे डॉ. महेश थोरवे यांच्या नावाची सर्वच स्तरातून चर्चा होऊ लागली आहे. यांच्या नावामुळे या मतदार क्षेत्रात राजकीय समीकरणे बदलून प्रस्थापितांना समर्थ आणि सक्षम पर्याय मिळण्याची दाट शक्यता आहे.

राष्ट्रवादी पक्ष शरदचंद्रजी पवार गटाचे बीड जिल्ह्यामध्ये वर्चस्व निर्माण झाले आहे. बजरंग बप्पा सोनवणे यांचा लोकसभा बीड मतदार संघात झालेला विजय व वाढलेले महत्त्व तसेच जातीय ध्रुवीकरण यामुळे या उमेदवारीला महत्व प्राप्त झाले आहे, त्यातच सूत्रांनुसार, डॉ. महेश थोरवे यांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाकडून नवा चेहरा म्हणून उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

डॉ. थोरवे यांचे शरद पवार साहेबांशी असलेले प्रत्यक्ष संबंध तसेच पूर्ण पवार कुटुंबाशी असणारा त्यांचा अनुबंध, मतदार संघासह संपूर्ण महाराष्ट्रभर असणारा त्यांचा दांडगा जनसंपर्क, कार्यकुशलता, युवकांमध्ये असणारी त्यांची लोकप्रियता, मतदार संघातील राजकीय कार्यकर्त्यांमधून त्यांना मिळणारा दुजोरा, मतदार संघातील काही बड्या नेत्यांचा पाठिंबा, जनमत आणि जनमताद्वारे उमेदवार बदलांचे संकेत या सर्व बाबी यांच्या उमेदवारीला पुष्टी देणाऱ्या आहेत. जातीय समीकरणातून



चर्चिल्या गेलेल्या आणि लोकसभा निवडणुकीत अटीतटीचा सामना झालेल्या बीड जिल्ह्याकडे आता सर्वच पक्षांचे लक्ष वेधले. तोंडावर आलेल्या २०२४ विधानसभा निवडणुकीत आता बीड जिल्ह्यात काय चित्र असेल यावर अवधा महाराष्ट्र डोळे लावून पाहत आहे. जातीय समीकरणे आणि मतांचे ध्रुवीकरण करू शकणाऱ्या उमेदवाराला संधी मिळू शकते. असे असताना प्राथमिक स्तरावर इच्छुक उमेदवारांची बरीच नावे बीड जिल्ह्यातील अनेक विधानसभा मतदार संघातून पुढे येऊ लागली आहेत. त्यापैकी आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातून डॉ. महेश थोरवे यांच्या नावाची सर्वच स्तरातून चर्चा सुरू झाली आहे. जनतेच्या अपेक्षा नुसार या मतदारसंघात उच्चशिक्षित आणि समाज परिवर्तनाची दिशा असणाऱ्या व्यक्तीकडे अधिक कौल असेल.

शैक्षणिक प्रशासक, नियोजन आणि निष्पादन तज्ञ, सामाजिक कृतीवादी कार्यकर्ता, लेखक, कवी, कलाकार व कुशल वक्तृत्व असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या डॉ. महेश थोरवे यांनी यापूर्वी विविध शासकीय-निमशासकीय जबाबदाऱ्या सांभाळलेल्या आहेत. साहित्य, समाजकारण, उद्योजकता व प्रशासन व्यवस्था अशा सर्वच स्त्रावर असणारा त्यांचा सहज वावर त्यांची बाजू भक्कम करतो. त्यामुळे विधानसभेची उमेदवारी त्यांना मिळावी अशी मागणी मतदारांकडून होत आहे. सर्व सामन्यांमध्ये मिसळणारे आणि सर्वांच्या मदतीसाठी रचनात्मक पातळीवर कार्यकुशल असणारे व्यक्तिमत्त्व ही त्यांची आजवर राहिलेली ओळख आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी असणारे हे व्यक्तिमत्त्व आता लोक प्रतिनिधी म्हणून आष्टी-पाटोदा-शिरुर मध्ये परिवर्तनाचा नवा चेहरा राहील यावर मतदार संघात जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यामुळेच डॉ. महेश थोरवे हे मतदार संघासाठी नवा उमदा चेहरा असू शकतात अशी शक्यता वर्तवली जात आहे. विरोधकांना दखल घ्यायला भाग पाडेल असा हा चेहरा किती आश्वासक राहू शकतो? लोकांची पसंती किती विश्वासाने पूर्ण होईल आणि थोरवे यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडेल का याकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

जनतेला नवीन चेहरा हवा आहे. त्यातच मला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद बघता व जनसामान्य लोकांकडून होणारा आग्रह म्हणून मी स्वतः आष्टी-पाटोदा-शिरुर मतदार संघातून येणारी विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असून मा. पवार साहेबांनी संधी आणि आशीर्वाद दिले तर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास सज्ज आहे.

- डॉ. महेश थोरवे

# संत भगवान बाबा शासकीय वस्तीगृहाची शंभर टक्के अंमलबजावणी करण्यात यावी

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील केज,गेवराई,शिरूर माजलगाव,पाटोदा, परळी वैजनाथ, या तालुक्यातील मोठ्या प्रमाणात ऊसतोड कामगार यांचे ऑक्टोंबर या महिन्यात साखर कारखाने सुरू झाल्यानंतर कोल्हापूर, सांगली व सातारा व इतर राज्यात कर्नाटक आंध्र प्रदेश अशा ठिकाणी स्थलांतर होतात त्यांच्यासोबत ० ते १८ वयोगटातील लाखो बालके स्थलांतर होत असतात.सन २०२२-२३ या कालावधीमध्ये अवनि संस्थेने कोल्हापूर जिल्ह्यातील ११ सहकारी साखर कारखान्यावर ० ते १८ वयोगटातील १८३९ बालकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षण मध्ये ० ते ३ वयोगट ३५५

४ ते ६ वयोगट ३५३ ७ ते १४ वयोगट ६५३ १५ ते १८ वयोगट ४९८ ७ ते १८ वयोगटातील बालकांना आई-वडिलांच्या सोबत उसाच्या फडात बालमजूर म्हणून काम करत होती. २०२४- २५ च्या गळीत हंगामामध्ये बालकांचे स्थलांतर रोखून त्यांना शाळेच्या प्रक्रियेत आणण्याकरिता शासनाने उपाययोजना कराव्यात. या संदर्भात अवनि संस्था कोल्हापूर ,राजर्षी छत्रपती शाहू प्रतिष्ठान बीड व जागर प्रतिष्ठान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने हे काम सुरू आहे

प्रामुख्याने बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांना मूळ गावी संत भगवान बाबा शासकीय वस्तीगृह मध्ये प्रवेश देऊन त्याचे शंभर टक्के हंगामी स्थलांतर रोखावे. त्यासाठी जिल्ह्यातील २२ वस्तीगृह पूर्णता सुरू करण्यात यावी. स्थलांतरच्या कालावधीमध्ये मुलींच्या दृष्टिकोनातून कस्तुरबा गांधी विद्यालय मध्ये हि प्रवेश देण्यात यावा. त्याचप्रमाणे अवनि संस्थेने गेली पाच वर्षापासून स्थलांतरित बालकांच्या विविध प्रश्नावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, समाज कल्याण अधिकारी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी गटशिक्षणाधिकारी यांना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आले. पण यावर शासनाने कोणत्याही प्रकारची उपाय योजना न केल्यामुळे कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यामध्ये हंगामी स्थलांतरित बालकांना उसाच्या फडामध्ये काम करावे लागत आहे. त्यामुळे ही मुले शाळाबाह्य होत आहे.

यासाठी शासनाने संत भगवान बाबा वस्तीगृह मध्ये मुलांना प्रवेश देऊन शंभर टक्के बालकांचे स्थलांतर रोखून त्यांना मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क मिळवून देण्यात यावा. त्याचप्रमाणे विद्यार्थी स्थलांतर झाल्यानंतर त्यांची हजरी पत्रकावर हजर म्हणून मूळ गावी नोंद केली जाते. पण प्रत्यक्षात विद्यार्थी हा स्थलांतरित ठिकाणी उसाच्या फडात काम करत असतो. असे सर्वेक्षण पाहणी दरम्यान आढळून आले आहे.तरी तसे होऊ नये यासाठी शासनाने ठोस उपाय योजना करावी. त्याच बरोबर काही कारणास्तव पहिली ते चौथीच्या वर्गातील बालके आई-वडिलांच्या सोबत स्थलांतर होतात. त्यांना शिक्षण विभागाने सोबत शिक्षण हमी कार्ड सक्तीने देण्यात यावे. व त्यानंतर स्थलांतर झाल्यानंतर ही सदरील मुलाच्या शिक्षणाचा पाठपुरावा शिक्षण विभागाने करावा.

३ ते ६ वयोगटातील बालकांना स्थलांतरित ठिकाणी राज्य शासनामार्फत शासनाच्या अंगणवाड्या सुरू करून त्यांना पोषण आहार देण्यात यावा. स्थलांतरित हंगामी विद्यार्थ्यांचे उल्लंघन होत आहे. याची दखल घेवून मानवी हक्क आयोगाने सुमोटो याचिका दाखल करून घेतली पुढील सुनावणी २६ ऑगस्ट रोजी होणार आहे.सुनावणी वेळी अवनी संस्थेच्या अनुराधा भोसले,अशोक तांगडे, तत्त्वशील कांबळे हे त्या ठिकाणी ऊसतोड कामगारांच्या बालकांची भूमिका मांडणार आहेत अशी माहिती पत्रकाद्वारे अनुराधा भोसले, तत्त्वशील कांबळे, अशोक तांगडे, मनीषा तोकले साताप्पा मोहिते व अमर कांबळे यांनी दिली ..

# केज मतदार संघात लाडकी बहीण योजनेचे सवा लाख अर्ज मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांची माहिती



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आमदार नमिता मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या पहिल्याच ऑनलाइन प्रस्ताव पडताळणी समितीच्या बैठकीत केज मतदार संघातील १ लाख २० हजार ९६ अर्ज मंजूर करण्यात आले आहे. त्यात केज तालुक्यातील २७ हजार ८८२, अंबाजोगाई तालुक्यातील ३७ हजार १६३ तर बीड तालुक्यातील ५५ हजार ५१ अर्जाचा समावेश असल्याची माहिती आ. नमिता मुंदडा यांनी दिली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अर्ज हे सर्व कागदपत्रांसह ३१ ऑगस्टपर्यंत स्वीकारण्यात येणार असून सध्या

अर्ज सादर करण्याची व छाननी प्रकिया सुरू आहे. त्रुटीमुळे नामंजूर करण्यात आलेल्या अर्जाची आवश्यक जुटी पुर्ण केल्यानंतर संबंधित सर्व अर्ज मंजूर करण्यात येणार आहेत. नारीशक्ती दुत पवरून व वेब अप्लिकेशन लिंकवर सदरील अर्ज भरावेत. नवीन अर्ज भरण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळाच्या सव्र्व्हरचे कामकाज सुरू असून गुरुवारनंतर या लिंकवर व नारी शक्ती दूतवर अर्ज भरता येणार आहेत. तर नव्याने आलेले अर्ज व ऑफलाईन पध्दतीने शिल्लक असलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याचे काम गुरुवारनंतर सुरळीत होईल. अशी माहिती ही आ. नमिता मुंदडा यांनी दिली आहे.

# एस.टी महामंडळाच्या बीड शिरूर मार्गावरील बसचालकाची मनमानी

## प्रवाशांना न घेताच स्थानकाच्या बाहेर काढली बस

शिरूरकासार (प्रतिनिधी)

बीड आगाराच्या बस चालकांचा मनमानी कारभार वाढला असून प्रवाशांना न घेताच स्थानकातून बस काढल्याचा प्रकार गुरुवारी सायंकाळी घडला आहे.या संदर्भात प्रवाशांनी आगार व्यवस्थापकांना निवेदन दिले आहे.बीड येथून शिरूरला येण्यासाठी मोठ्या वेळेच्या फरकाने बस असून सकाळी सात ते दहा या तीन तासांच्या अंतरात एकही बस नसल्यामुळे प्रवाशांसह विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे.

सायंकाळी साडेपाच वाजता बीड ते पिंपळनेर हि शिरूर मार्गे असलेली बस अवेळी सुटत असल्यामुळे प्रवाशांना संभ्रम निर्माण होतो.गुरुवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता असलेली बस क्रमांक एम.एच.२० बी.एल.१६७२ हि बस सायंकाळी ५ वाजता नियोजित फलाटावर

न लागता दुसऱ्याच फलाटावर लागली आणि अवघ्या तीन मिनिटांतच प्रवाशी न घेता बाहेर पडली.त्यामुळे प्रवाशांना नाहक बस स्थानकाबाहेर पावसात भिजत उभे रहावे लागले.बस चालकाच्या या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्यांसह,ज्येष्ठ नागरिक आणि इतर प्रवाशांचे हाल झाले.त्यामुळे प्रवाशांचे हाल होऊ नये म्हणून बीड ते शिरूर रायमोहा मार्गे दर अर्ध्या तासाला बस उपलब्ध करून देण्याची मागणी संदीप गाडेकर,अशोक शिंदे,प्रमोद ढवान,प्रल्हाद विघ्ने,योगेश भांडेकर यांनी आगार व्यवस्थापकांकडे केली आहे.




# सावरगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील सावरगाव तालुका आष्टी येथे साबादप्रमाणे या वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे ह,भ, प भागवत महाराज उबरेकर वृद्धेश्वर निवासी ह भ प भानुदास महाराज मस्के हरिभक्त परायण दिनकर महाराज मस्के हरिभक्त परायण मुरलीधर महाराज देशमाने हरिभक्त परायण किशोर महाराज मस्के हरिभक्त परायण सचिन महाराज मस्के हरिभक्त परायण कृष्ण महाराज मस्के यांच्या अधिपत्याखाली व जनता जनार्दनाच्या सहकार्याने सत्ता संपन्न होत आहे या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन ठेवण्यात आले आहे मंगळवार दिनांक ६/ ८ /२०२४ रोजी हरिभक्त परायण नाथकन्या साध्वी महंत मुक्ताई नाथ माऊली मुक्ताई मठ संस्थान उदगीर बुधवार ७ /८/ २०२४ रोजी हरिभक्त परायण भगवान महाराज मचे हरिहरेश्वर संस्थान डमाळवाडी गुरुवार दिनांक ८/ ८ २०२४ हरिभक्त परायण ज्ञानेश्वर माऊली कराळे करंजी घाट शुक्रवार दिनांक ९/८/ २०२४ ११ /८/२०२४ ह भ प रामायणाचार्य रवींद्रनाथ महाराज सुद्रिक मुळेवाडी/ १२/८/ २०२४ हरिभक्त परायण चैतन्य महाराज शास्त्री श्री क्षेत्र जुना गहीनाथगड याची कीर्तन सेवा होणार असून मंगळवार दिनांक १३/ ८ / २०२४ रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत ह भ प भागवत महाराज उबरेकर वृद्धेश्वर निवास यांचे काल्याचे किर्तन होऊन नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी सर्व भाविकांनी लाभ घ्यावा अशी आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे

# डॉ. संतोष काशिद यांना उत्कृष्ट प्रबंध लेखनाचा पुरस्कार

पुणे :- प्रतिनिधी

संघवी केशरी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. संतोष काशिद यांना अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था(नाशिक )पुणे केंद्र यांच्या वतीने दिला जाणारा उत्कृष्ट प्रबंध लेखनाचा आणि संशोधनाचा शै. वर्ष २०२३-२४ चा मराठी संस्कृतीचा पुरस्कार, रुपये ५०००/- आणि सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले .




हा पुरस्कार टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे उपाध्यक्ष मा. डॉ. रोहित टिळक यांच्या हस्ते पुणे येथे प्रदान करण्यात आला. याप्रसंगी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सर्व पदाधिकारी , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे आणि संघवी केशरी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. प्रवीण जावीर हे उपस्थित होते. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राचार्य व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून त्याचे अभिनंदन करण्यात आले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# एन. एस.एल. शुगर युनिट ३ जय महेश साखर कारखान्यावर गुन्हा दाखल करा-शेतकरी ज्ञानेश्वर शिंदे

माजलगाव / प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे पवारवाडी शिवारातील जमीन गट नंबर/सर्वे नंबर ६३ /अ मध्ये ००हे.५० तील जमीन ज्ञानेश्वर रावण शिंदे यांच्या मालकी हक्काची असून याच जमिनीत ते मेहनत व मशागत करून आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवतात गेल्या महिनाभरापासून एन. एस. एल. शुगर्स युनिट ३ जय महेश साखर कारखान्याचे घाण पाणी नदीला सोडल्यामुळे सदर पाणी हे ज्ञानेश्वर रावण शिंदे यांच्या शेतातील बोअरवेल मध्ये उतरले असून बोअरवेल चे पाणी खराब व दूषित झाले आहे

यामुळे या पाण्यापासून आपल्या कुटुंबास धोका निर्माण झाला असून शेतीला देखील हानी पोहोचत आहे. या घाण पाण्याचा माझ्या शेतातील पिकावर परिणाम होत आहे व सध्या स्थितीत उभ्या असलेल्या पिकाचे नुकसान होत आहे.

याबाबत अनेक वेळा एन. एस. एल. शुगर युनिट ३ जय महेश साखर कारखाना पवारवाडी यांना निवेदन देऊन ही त्यांनी कसल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही तरी माझ्या निवेदनावरून संबंधित कारखान्यावर व संबंधित अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करून सदरील पाण्याचा तात्काळ बंदोबस्त करण्यात यावा अन्यथा माझ्या कुटुंबाच्या वतीने मी तहसील कार्यालयासमोर दि.१५/०८/२०२४ रोजी झेंडावंदनापूर्वी आत्मदहन करणार आहे असे निवेदन शेतकरी ज्ञानेश्वर रावण शिंदे यांच्यावतीने माजलगाव तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

# शिरूर शहरात साडेअकरा कोटी रुपयाची विकासकामे प्रगतीपथावर

## माजी मंत्री सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश
## अग्निशामक दलाच्या इमारतीसह स्मशानभूमीच्या कामांचा समावेश

शिरूरकासार (प्रतिनिधी)

नगरोत्थान विकास योजनेंतर्गत शहरात साडेअकरा कोटी रुपयांची विकासकामे प्रगतीपथावर असुन माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांतून सदरील कामे पूर्णत्वास जात आहेत. विकास कामांमध्ये शहरासाठी महत्वाच्या आणि गरजेच्या असलेल्या कामांचा समावेश असून माजी मंत्री सुरेश धस यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून भरीव निधी आणला आहे.या कामांमध्ये अग्निशामक दलाची इमारत,कर्मचारी वसाहत,पार्किंग शेड यासह बुध्दविहार,स्मशानभूमी संरक्षण भिंत बांधकाम,मुख्य वेशीचे सुशोभीकरण,प्रभागांतर्गत रस्ते,सौर ऊर्जेवरील पथदिव्यांच्या कामांचा समावेश आहे.अग्निशामक दलाच्या इमारतीसाठी एक कोटी नव्वद लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद असून त्यापैकी १९ लक्ष रुपये नगरपंचायतीच्या



वतीने स्वनिधी अनुदान म्हणून भरण्यात येणार आहे.शहराचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या गांधी चौकातील पुरातन वेशीचे सुशोभीकरण करण्यासाठी ४० लक्ष रुपये आणि रस्त्यासाठी १० अशी एकूण पन्नास लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.बुद्ध विहाराच्या पन्नास लक्ष रुपयांच्या कामाचे भूमिपूजन देखील झाले आहे.शहरातील प्रभागांतर्गत ५ कोटी रुपयांची रस्त्यांची ४० कामे पूर्णत्वास गेली असून ७० लक्ष रूपये खर्च करुन २८ सौर पथदिवे बसविण्यात आले आहेत.दोन कोटी रुपयांची स्मशान भूमीसाठी संरक्षण भिंतीचे देखील काम सुरू असून इतरही कामांना लवकरच सुरुवात होणार आहे.



बीड - जिल्हा वकील संघ संघाच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञाचा सन्मान आणि गुणगौरव सोहळा बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवाचे अध्यक्ष अँड व्हि.डी. साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड पी एस राजापूरकर यांच्या पुढाकाराने संपन्न झाला. यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ यांच्यासह न्यायमूर्ती, बीड जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT